
# महात्मा फुले
## चिंतन आणि चर्चा

• संपादक •

डॉ. भगवान डोंगरे
डॉ. गोवर्धन मुळक



Scanned by TapScanner

| | | |
|---|---|---|
| ६३. | **महात्मा फुले यांच्या विचारातील स्त्री प्रश्न आणि सुधारणा**<br>श्रीमती स्वाती बोकार | २१८ |
| ६४. | **महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार आणि कार्य**<br>प्रा. मनोहर वागतकर | २२१ |
| ६५. | **महात्मा फुले यांच्या विचारातील स्त्री प्रश्न आणि सुधारणा**<br>प्रा. बानायत जी.एच. | २२६ |
| ६६. | **स्त्रियांचा उध्दारकर्ता : महात्मा जोतीराव फुले**<br>डॉ. छाया मा. नेम्मानीवार | २२८ |
| ६७. | **भारतीय स्त्री शिक्षणातील महात्मा जोतीराव फुले यांचे योगदान**<br>भिमराव दत्तू मोट | २३१ |
| ६८. | **महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षणविषयक विचार आणि कार्य**<br>वैशाली अशोक जाधव | २३३ |
| ६९. | **माहात्मा जोतीबा फुलेजी के महिला विषयक विचार**<br>प्रा.डॉ. मदिना सिकंदर शेख | २३७ |
| ७०. | **महात्मा फुले यांच्या विचारातील स्त्री प्रश्न आणि सुधारणा**<br>प्रा. डॉ. राणी जगन्नाथराव जाधव | २३९ |
| ७१. | **महात्मा फुले यांचे शिक्षणाविषयक आणि कार्य**<br>डॉ. लक्ष्मणसिंग साळोक - विलास पारखे. | २४४ |
| ७२. | **महात्मा फुले यांच्या स्त्री विषयक विचार आणि कार्याचे समाजशास्त्रीय अध्ययन**<br>प्रा.डॉ. तंगलवाड दत्ता माधवराव | २४७ |
| ७३. | **सत्यशोधक समाज, निवडक सत्यशोधक व त्यांचे साहित्य**<br>प्रा.के. एम. कांबळे | २५२ |
| ७४. | **महात्मा फुलेंचे सामाजिक कार्यात योगदान**<br>प्रा. रमेश नानजी गावित | २५६ |
| ७५. | **महात्मा जोतीबा फुलेंच्या विचारांची प्रासंगिकता**<br>प्रा. डॉ. सुनिल प्रल्हाद गायगोळ | २६१ |
| ७६. | **महात्मा फुले यांचे समाज परिवर्तनविषयक कार्य**<br>प्रा.डॉ. नरसिंग आबासाहेब पवार | २६६ |
| ७७. | **महात्मा जोतीराव फुले यांच्या सत्यशोधक समाजाची अधिवेशने**<br>प्रा. डॉ. विजय पाटील | २७० |
| ७८. | **महात्मा फुले यांचे समाजोपयोगी कार्य**<br>प्रा. पोपळघट आर. एस. | २७२ |


Scanned by TapScanner

# महात्मा फुले यांच्या विचारातील स्त्री प्रश्न आणि सुधारणा

**प्रा. डॉ. राणी जगन्नाथराव जाधव**
गृहविज्ञान विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी.
ता. गेवराई, जि. बीड

**सारांश**

स्त्रिया विषमाधिष्ठित हिंदू समाजरचनेच्या बळी होत्या. भारतीय समाजात स्त्रियांचा दर्जा अत्यंत खालच्या प्रतीचा होता. स्त्रीविषयक सामाजिक रुढी व परंपरा अत्यंत घाणेरड्या व माणुसकीहीन होत्या. आर्थिक पिळवणूक, शारीरिक व मानिकस छळ, उपासमार, स्त्री बालहत्य, विजोड विवाह, बालविवाह घटस्पोट, परित्याग, आत्महत्या, वेश्यावृत्ती, अतिश्रम, अपमान, मारझोड, बलात्कार, खून, लैंगिक, उपासमार, दुय्यम स्थानल, समाजिक व कौटुंबिक बहिष्कार, संशय यासारखे अनेक प्रश्न स्त्रियांच्या संबंधित असल्याने निरक्षरता अज्ञान अंधश्रध्दा सामाजिक व कौटुंबिक स्थिती निव्ळ दयनीय स्वरुपाची असल्याने जोतीरावांचे लक्ष स्त्रियांच्या दु:खाकडे होत असे. बालविवाहामुळे स्त्रीला भोगावा लागणारा त्रास, कुमारी जरठ विवाहामुळे निर्माण होणारे अकाली वैधव, पुर्नविवाहास बंदी, आर्थिक आणि सामाजिक शोषण, बालवयातील गर्भधारणा नि मातृत्व यामुळे निर्माण होणारे आरोग्याचे प्रश्न इत्यादी प्रश्न जोतीरावांना सातत्याने क्लेष निर्माण करून देत असत. स्त्रियांची परिस्थिती सुधारवयाची असले तर सर्वप्रथम त्यांना शिक्षण देवून डोळस करायला पाहिजे. शिक्षण हे सर्वांगीण उन्नतीचे साधन आहे. हे ओळखून त्यांनी १८४८ साली बुधवार पेठेत मुलींची शाळा सुरू केली ती शाळा बंद पडल्यानंतर १८५१ मध्ये पुन्हा शाळा सुरू करण्यात आली. या ज्ञनदानाच्या कार्यात त्यांना समाजातील अनेक विरोधकांना तोड द्यावे लागले. याशिवाय बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन, पुर्नविवाहास प्रोत्साहन, केशवपन प्रथेला विरोध, बहुजनांच्या मुलांसाठी वसतिगृहाची स्थापना, सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून सामाजिक विषमता व जातीयता नष्ट करण्यासाठी त्यांनी आहोरात्र प्रयत्न केले. याकामी सावित्रीबाई फुले यांचे फार मोठे योगदान आहे. समाजक्रांतीच्या वाटेवर फुलांच्या पायघड्या नसतात तर काटेकुटे अंधरलेले असतात. त्याच वाटेवरुन भक्कमपणे पावले टाकणाऱ्या जोतीरावांना सावित्रीमाईंनी समर्थपणे साथ दिली व रुढी परंपरेने साखळदंडात अडकलेल्या माता - भगिनीसाठी आपल्या जीवनाचा होम करुन त्यांना समताधिष्ठीत व सन्मानाचे जीवन बहाल केले.

**प्रस्तावना :**

क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले म्हणजे आद्यसमाजक्रांतीची धगधगणारी एक मशाल होती. त्या धगधगणाऱ्या मशालीने बहुजनांच्या उपेक्षितांच्या शूद्र - अतिशयशूद्रांच्या, स्त्रियांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश निर्माण करुन त्यांना जीवनात राजमार्ग दाखविला. भारतीय सामाजिक सुधारणेच्या अनेक समाजसुधारकांनी आपल्या विचारांची व कर्तत्वाने आपला काळ गाजविला आहे. मात्र महात्मा फुलेंनी जातीभेद, अस्पृशता स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुध्द लढ्याचे युग घडविले आहे. समाजप्रबोधनाचे, समाज परिवर्तनाचे व समाज जागृतीचे महान कार्य करण्याचे माध्यम शिक्षण आहे. त्याशिवाय भारतीय समाजातील स्त्रियांची प्रगती होणार नाही त्यांच्या समस्या सुटणार नाही हे ओळखून त्यांनी संपूर्ण हयातभर कार्य केले. सर्व प्राण्यात मानवश्रेष्ठ व मानवात स्त्री श्रेष्ठ जिच्या हाती पाळण्याची दोरी तीच जगाते उध्दारी या सत्याचा प्रत्यय येताच त्यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई स्वत: शिकवून या देशातील पहिल्या शिक्षिका व मुख्याध्यापिका करून स्त्रीयाविषयक शैक्षणिक व समाजिक कार्य केले. फुले



Scanned by TapScanner

यांना माणसामाणसातील असमानता गुलामगिरीचे प्रतीक वाटत होते. स्त्री- पुरुषांत असमानतादेखील गुलामगिरीचे प्रतिक होय. फुले यांच्या मते समाजात स्त्रियांना पुरुषाहुनही काहीसे श्रेष्ठ स्थान असावे कारण त्याच आपल्या उदरात बालकास वाढवून त्यांचे संगोपन करतात. स्त्रियांच्या तुलनेत पुरुष अधिक क्रुर दुष्ट असतो. पुरुषांना त्यांच्या चुका क्षम्य व स्त्रियांना तशाच चुकांविषयी शिक्षा हे समाजिक विषमतेचे व पुरुषप्रधान संस्कृतीचे द्योतक आहे हे कुठेतरी थांबले पाहिजे. त्यासाठी स्त्री - शिक्षण व स्त्री - पुरुष समानता हे सूत्र स्वीकारणे आवश्यक आहे. असे त्यांचे विचार होते.

**समस्यासुत्रण -**

एकोणिसाव्या शतकाच्या कालखंडात भारतीय समाजात अनेक समाजसुधारक होवून गेले. त्यांनी तत्कालीन सामाजिक समस्या, सोडविण्यासाठी व समाजपरिवर्तनाच्या माध्यमातून सामाजिक सुधारण करण्याचे मौलिक कार्य केले. वैदिक कालखंडात तयार करण्यात आलेल्या वेगवेगळया धर्मग्रंथानुसार पुरुषांना प्राधान्य व स्त्रीयांवर अनेक प्रकारचे बंधने लावून त्यांना अंत्यत हीन दर्जाची वागूणक दिली जात असे त्यामुळे त्यामुळे स्त्रीयांच्या अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. अशा स्त्रीयांच्या समस्या दुर करण्यासाठी संपूर्ण जीवनभर कार्य करणाऱ्या एका महान समाजसुधारकाचा अर्थात महात्मा जोतीराव फुल्यांच्या कार्याचा आढावा येथे घेण्यात आला आहे.

**संशोधन विधान :**

महात्मा फुले यांच्या विचारातील स्त्री प्रश्न आणि सुधारणा या अनुषंगाने हा संशोधन विषय घेवून तत्कालीन समाजातील स्त्रियांच्या समस्या निवारणासाठी कार्यकरणाऱ्या समाजसुधारकापैंकी महात्मा फुल्यांनी केलेल्या महान कार्याचे अध्ययन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधन पध्दती : -**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**संशोधनाची क्षेत्र मर्यादा : -**

महात्मा फुले यांच्या विचारातील स्त्री प्रश्न आणि सुधारणा यासंबंधी अध्ययन करत असताना केवळ महात्मा जोतीराव फुले यांच्याच कार्याचा अभ्यास करण्यात आला आहे. ही संशोधनाची मर्यादा आहे.

**नमुना निवडः -**

आधुनिक कालखंडातील भारतीय स्त्रीयांचेच प्रश्न सोडविण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी कार्य केलेले आहे. त्यापैकी महात्मा जोतीराव फुले यांनी स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी केलेल्या कार्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे.

**तथ्य संकलनाची साधने : -**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी तथ्य संकलन करताना दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. यात संदर्भग्रंथ, शोधनिबंध, वर्तमानपत्र, मासिके इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे : -**

प्रस्तुत संशाधन कार्याला निश्चित दिशा प्राप्त होण्यासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली .

१) आधुनिक भारतीय समाजाच्या जडणघडणीत महात्मा फुले यांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

२) महात्मा फुले यांच्या विचारातील स्त्रीयांच्या प्रश्नाचा आढावा घेणे.

३) महात्मा फुले यांनी स्त्रियांच्या बाबतीत केलेल्या सुधारणाचा आढावा घेणे.

**संशोधनाची गृहितके : -**

१) स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी महात्मा जोतीराव फुल्यांनी आपले संपूर्ण आयुष्यभर प्रयत्न केले.

२) आधुनिक भारतातील स्त्रीयांच्या दर्जातील परिवर्तनात महात्मा फुल्यांचे मोलाचे योगदान केले.



Scanned by TapScanner

३) स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी महात्मा फुले यांनी अहोरात्र प्रयत्न केले तरीदेखील आजही स्त्रियांचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

**माहितीचे विश्लेषण : -**

भारतीय आद्यसमाजक्रांतीचे जनक, तमाम बहुजन समाजाचे उध्दारकर्ते, थोर समाजसेवक, एकोणिसाव्या शतकात सामाजिक, शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रात क्रांती घडविणारे क्रांतीदूत, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी गोविंदराव आणि चिमणाबाई यांच्या पोटी झाला २५ डिसेंबर १८२७ म्हणजेच ज्योतिराव साडेआठ महिन्याचे असताना आई चिमणाबाई यांचे निधन झाले. त्यावेळी त्यांच्या शेतावरती मोलमजुरीसाठी येणाऱ्या काही महिलांनी त्यांचे संगोपन केले. त्यानंतर १ मे १८२९ पासून जोतीरावांची मावस बहिण सगुणाबाई क्षिरसागर यांनी ज्योतिरावांचा सांभाळ केला. सगुणाबाई विधवा होत्या माहेरी आधार नव्हता त्यामुळे त्यांचा मावस भाऊ जोतीरावच त्यांचा आधार बनले होते. १८३३ मध्ये चर्च ऑफ स्कॉटलंड मिशनच्या शाळेत जोतीरावांचे नाव दाखल करण्यात आले. लेखन, वाचन, गणित यामध्ये त्यांनी मन लावून अध्ययन सुरू केले. परंतु कृष्णाजी देव नावाच्या ब्राम्हण कारकुनाच्या कुसल्ल्यावरुन गोविंदरावांनी जोतीरावांना शाळेतून काढून टाकले. त्यामुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडला परंतु ध्येयाशी एकरुप असणारे जोतीराव ज्ञानाबद्दल, शिक्षणाबद्दल प्रचंड जागरुक होते. त्यांचे वाचन, लेखन, चिंतन चालू होते. त्यांच्या घराशेजारी राहणारे उर्दू पार्शियन भाषेचे पंतोजी गफारबेग मुनशी व ख्रीस्ती धर्मोपदेशक लिजीट साहेबया पुरोगामी विचाराच्या लोकांच्या सांगण्यावरुन गोविंदरावांनी जोतीरावांना वयाच्या १४ व्या वर्षी १८४१ साली पुन्हा शाळेत दाखल केले. इ.स. १८४० मध्ये जोतीरावांच्या विवाह खंडूजी नेवसे पाटलाच्या सावित्रीमाईशी झाला. त्यावेळी सावित्रीमाईचे वय आठ वर्षे तर ज्योतिरावाचे वय तेरा वर्षे होते. महात्मा फुले यांनी थॉमस पेनची पुस्तके वाचली. त्यांच्या विचाराच्या प्रेरणेने त्यांनी ब्राम्हणवादावर हल्ला चढवून भारताच्या भूमित शूद्र, अतिशूद्र, स्त्रीयांना जगण्याचे अधिष्ठान प्राप्त करुन दिले. व आपल्या कार्यकर्तृत्वाने इतिहासात अजरामर झाले.

**महात्मा फुलेंचे शैक्षणिक कार्य :**

तत्कालीन समाजातील बहुजनांच्या दुःखाचे कारण अविदयेत आहे. हे महात्मा फुलेनी ओळखले आणि शिक्षण हे सर्वांगीण उन्नतीचे साधन आहे. जिच्या हाती पाळण्याची दोरी तीच जगाते उध्दारी थोर मातांच्या पोटीच थोर स्त्री - पुरुष जन्माला येत असतात हे ओळखून त्यांनी स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिले व १ जानेवारी १८४८ साली मुलींची पहिली शाळा सुरू करुन फुले दांपत्याने एका नवीन युगाला प्रारंभ केला. भारतीय व्यक्तीने भारतीय मुलींसाठी काढलेली ही पहिली शाळा होय. सुरूवातीला याशाळेत चार ब्राम्हण, एक धनगर व दोन मराठा अशा सहामुली होत्या. सुरूवातीच्या काळात पालक मुलींना शाळेत पाठवत नसत. त्यावेळी फुले दाम्पत्यांनी पालकांशी घरोघरी जाऊन त्यांचे मुलींच्या शिक्षणासाठी मतपरिवर्तन केले. त्यानंतर १५ मे १८४८ रोजी पुण्यातील महारवाड्यात मुलांमुलींसाठी शाळा सुरू केली. १८४८ साली काढलेली शाळा बंद झाल्यांनतर त्यांनी अण्णासाहेब चिपळूणकरांच्या वाड्यांत ३ जुलै १८५१ मध्ये पुन्हा शाळा सुरू केली. त्यांनतर उत्तरोत्तर त्यांना आलेले यश पाहून पुणे व परिसरात शाळा सुरू करुन फुले दाम्पत्यांनी स्त्रीमुक्तीच्या ऐतिहासिक कार्याला गती दिली. ज्ञानदानाच्या याकार्यात सावित्रीमाईचा मोलाचा वाटा आहे. हे कार्य करत असताना त्यांना समाजातील विरोधकांना तोंड द्यावे लागले . या देशातील स्त्री दलित बहुजन समाजातील मुला - मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देवून हजारोवर्षापासून धर्माच्या नावाखाली दबलेला आवाज बुलंद करुन गुलामगिरीला झुगारुन देण्याचे सामर्थ्य शिक्षणातून स्त्रियांमध्ये निर्माण केले. म्हणूनच ताराबाई शिंदे, मुक्ता साळवे सारख्या तत्कालीन समाजातील व्यवस्थेला जाब विचारण्याचे क्रांतिकारी कार्य केलेल्या विद्यार्थीनी निर्माण झालेल्या आपणास पहावयास मिळतात. महात्मा फुलेयांनी शिक्षणाद्वारे माणसातील माणुसपण जागे करुन स्त्रियांना समान मानसन्मान देवून स्त्री - पुरुष विषमता दूर करण्याचे ऐतिहासिक कार्य केले.



Scanned by TapScanner

**न्हाव्यांच्या ऐतिहासिक संपाद्वारे केशवपन प्रथेला विरोध : -**

त्या काळात महिलांचे केशवपण होत असे. राजा राममोहन रॉय यांनी सतीची प्रथा बंद केली असली तरी ही प्रथा तत्कालीन समाजात रुढ होती. विधवा स्त्रीने संन्यासीनीसारखे जीवन जगावे तिला अपशकुनी समजले जाई तिला पांढरे वस्त्र परिधान करुन घरातच कोंडून ठेवले जाई केशवपनामुळे स्त्रीया विद्रुप दिसत फुले दाम्पत्याने या स्त्रीयांचे दुःख जवळून पाहिले होते. त्यामुळे ही दुष्ट प्रथा बंद करण्याचे त्यांनी ठरविले परंतू लोक ऐकेनात तेव्हा ज्योतिरावांनी व सावित्रीमाईंनी सर्व न्हाव्यांची एक सभा बोलावली आणि आपण आपल्या भगिनीवर वस्तरा चालवीत हे केवढे पाप आहे याची जाणीव त्यांना करुन दिली व त्यांना केशवपनास जावू नका असे सांगितले व जोतीराव व सावित्रीमाईच्या प्रेरणेतून नारायण मेघाजी लोखंडे यांनी न्हाव्यांच्या ऐतिहासिक संप घडवून आणला व विधवा स्त्रीला देखील माणूस म्हणून जगण्याचा अधिकार आहे तो कोणी हिरावून घेता कामानये हा विचार जनमाणसात रुढ केला.

**बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना :**

लैंगिक शौषणामुळे किंवा चुकीचे पाऊल पडल्यामुळे अनेक विधवा स्त्रीयांना गर्भधारणा होत असे. अशावेळी गर्भपात करणे किंवा आत्महत्या करेण एवढाच मार्ग विधवा स्त्रियांपुढे असे अशा विधवा स्त्रियांसाठी जोतीराव व सावित्रीमाई फुले यांनी २८ जानेवारी १८५३ साली बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली पुण्यातील चौकाचौकात त्यांनी फलक लावले विधवा भगिनींनो आत्महत्या करु नका किंवा पोट ही पाडू नका जोतीराव फुले यांच्या घरी या व गुप्तपणे बाळंत व्हा आपले मुल न्यायचे किं इथे ठेवायचे ते तुम्ही ठरवा तुमचे नाव गुप्त ठेवले जाईल अनाथ आश्रम त्या निरापधार जीवनांचा सांभाळ करील पुण्याबरोबर काशी, वाई, सातारा, नाशिक, पंढरपूर इथे अशा जाहिराती लागल्या हे दाम्पत्य एवढ्यावरच थांबले नाही तर काशीबाई नातू नामक ब्राम्हण विधवा स्त्रीचे बाळंतपण करून तिचे मुल दत्तक घेतले व त्यांचे नाव यशवंत ठेवले त्याला उच्चशिक्षण देवून दीन दुबळ्यांच्या सेवेसाठी डॉक्टर बनविले इतका उदात्तपणा क्वचितच पहावयास मिळेल.

**आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन : -**

जोतीरावांनी व सावित्रीमाई यांनी समताधिष्ठीत समाजाच्या निर्मितीसाठी आपला दत्तक मुलगा यशवंत याचा विवाह ४ फेब्रुवारी १८८९ रोजी सत्यशोधक पध्दतीने ज्ञानोबा ससाणे यांची कन्या राधा उर्फ लक्ष्मीबाई यांच्यासोबत लावला हा आधुनिक भारतातील पहिला आंतरजातीय विवाह होय अशाप्रकारे समाजसुधारणेचे कार्य यांनी स्वतःच्या घरापासून प्रारंभ केले.

**समताधिष्ठीत समाजासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना : -**

तत्कालीन समाजाचे जातीवार विभाजन आणि त्यातून निर्माण झालेली समाजिक तथा आर्थिक विषमता अतिशूद्रांना व स्त्रियांना जनावरांपेक्षाही मिळणारी हीन वागणुक हा जोतीरावांचा चिंतनाचा विषय होता. अशा विषमतावादी अनिष्ठ रुढी परंपराना फाटा देणारा बहुजन समाजाच्या हिताचा असणारा समताधिष्ठीत सत्यशोधक समाज त्यांनी स्थापन केला. सत्यशोधक समाजाच्या अनेक परिषदामधून जोतीरावांनी समाजप्रबोधन केले.

**अनिष्ठ रुढी परंपरांना व अंधश्रध्देला पायबंद : -**

तत्कालीन समाजात स्त्रियांचे अनेक प्रश्न अस्तित्वात होते यात बालविवाह, कुमारी जरठ विवाह,. अकाली वैधव्य, पुनर्विवाहास बंदी, आर्थिक व सामाजिक शोषण, चारित्र्याविषयी संशयामुळे घरातून हाकलनू देणे त्यातून परितक्ता म्हणून भोगावे लागणारे दुष्परिणाम, बालवयातील गर्भारपण नि मार्तृत्व यामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्याच्या समस्या, परक्याचे धन म्हणून मुलीची केली जाणारी हेळसांड इत्यादी प्रश्नावर जोतीरावांनी शिक्षण हा एकमेव उपाय सांगून वेळोवेळी समाजप्रबोधनाद्वारे प्रसंगी कायद्याने पायबंद घातला त्यांनी आपल्या लेखनाद्वारे बजहुजन समाजाला स्वर्ग नरक, पाप, पुण्य, पुनर्जन्म, या भ्रामक कल्पनातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला शिकलेल्या स्त्रियांनी जर तांदुळ शिजवला तर त्याच्याअळया होतील एवढे स्त्रियांसाठी शिक्षण वाईट आहे अशा प्रकारची भयानक अंधश्रध्दा पसरलेली असताना जोतीरावांनी प्रथम पत्नीला शिकवून साक्षर केले. बोले तैसा



Scanned by TapScanner

चाले या आदर्शाची शिकवण समाजात रुजवली.

**निष्कर्ष : -**

१) स्त्रियांना व बहुजन समाजाला अनिष्ठ रुढी परंपरातून बाहेर काढून शिक्षणाची व पर्यायाने व्यक्तिमत्व विकासाची संधी मिळावी यासाठी महात्मा जोतीराव फुले यांनी शाळा व वसतिगृहाची स्थापना केली.

२) स्वतःच्या दत्तक मुलाचा आंतरजातीय विवाह लावून अस्पृश्यता निवारण्याचे कृतीशील उदात्त कार्य केले.

३) जोतीरावांनी विधवा मातांना आत्महत्यापासून व भ्रुणहत्येपासून रोखण्यासाठी आणि सन्मानाने जीवन जगण्यासाठी बालहत्या प्रतिबंधगृहाची स्थापना केली.

४) सत्यशोधक समाजाची स्थापना करून सामाजिक समता देशातील जातीयता स्त्री - पुरुष विषमता नष्ट करण्यासाठी व स्त्रियांचा दर्जा वाढविण्यासाठी समाजपरिवर्तनाचे कार्य केले.

५) आपल्या लेखनातून व भाषणातून व प्रत्यक्ष कृतीतून त्यांनी समाजातील अनिष्ठ रुढी परंपरांना पायबंद घातला. स्वर्ग, नरक, पाप, पुण्य पुर्वजन्म, पुनर्जन्म यांच्या नावाखाली स्त्रियांचे शोषण थांबविले व विविध अंधश्रध्दांना तिलांजली दिली.

**संदर्भ :**


१) चंद्रशेखर गायकवाड ( एप्रिल २०१५) मानवमुक्तीचा संघर्षयात्री महात्मा जोतीराव फुले, ओमप्रकाशन, अकलूज

२) डॉ. मनोहर सिरसाठ प्रा. शरद सदाफुले, प्रा. शाम कुंड, प्रा. बाबू वादे (एप्रिल २०११) फुले आंबेडकरी चळवळ : विचार आणि भूमिका, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद

३) डॉ. दा धों काचोळे (जुलै १९९९) भारतीय सामाजिक विचारवंत, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद

४) डॉ. दत्तात्रय मेढेकर (२०१०) शिक्षणातील ज्ञानेश्वर, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

५) डॉ. ज्योति डोईफोडे (२०१२) समाजशास्त्रीय विचारप्रवाह, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

६) प्रा. गौतम ज निकम (सप्टेंबर २००९) महामानव, अभिनंदन प्रकाशन, अकोला.

७) www.bookganga.com


❑◆❑




Scanned by TapScanner